**ठळक बातम्या**

- भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले तीन हुतात्मा क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना देशाची आदरांजली

- जगातली पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारतानं ऊर्जा क्षेत्रात व्यापक आणि वैविध्यपूर्ण संबंध स्थापन करायला हवेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी अकराशे कोटींचा त्र्यंबकेश्वर विकास आराखडा तयार असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- दिल्ली उच्च न्यायालयातल्या वादग्रस्त न्यायधीशांच्या चौकशीसाठी तीन सदस्यांची समिती स्थापन

**आणि**

- भारतीय बास्केटबॉल संघ फिबा पुरुष एशिया चषक स्पर्धेसाठी पात्र

**<><><><><>**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले तीन वीर क्रांतीकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना संपूर्ण देश आज श्रद्धांजली वाहत आहे. १९३१ मध्ये आजच्याच दिवशी लाहोरच्या मध्यवर्ती तुरुंगात या तीन वीरांना फाशी देण्यात आली होती. या दिवसाचं शहीद दिन म्हणून स्मरण करण्यात येतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या तिन्ही वीरांना श्रद्धांजली वाहिली आहे. समाजमाध्यमावर एका व्हिडिओद्वारे मोदी यांनी भगत सिंह, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाचं स्मरण केलं आहे. स्वातंत्र्य आणि न्यायासाठी या क्रांतीकारकांनी दाखवलेलं दुर्दम्य साहस आणि सर्वोच्च बलिदान देशवासियांना प्रेरित करेल, असं प्रधानमंत्री मोदी म्हणाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहीद दिनानिमित्त आज सकाळी नाशिकच्या शासकीय विश्रामगृहात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

<><><><><>

सामाजिक न्यायाचे खंदे समर्थक आणि महान स्वातंत्र्यसैनिक डॉक्टर राम मनोहर लोहिया यांची आज जयंती. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोहिया यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. लोहिया हे एक दूरदर्शी नेता होते. वंचितांना सबल करण्यासाठी आणि सक्षम भारताच्या निर्माणासाठी लोहिया यांनी आपलं जीवन समर्पित केलं, असं प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरील एका पोस्टमध्ये लिहिलं आहे.

<><><><><>

जगातली पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारतानं ऊर्जा क्षेत्रात व्यापक आणि वैविध्यपूर्ण संबंध स्थापन करायला हवेत, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल केलं. मुंबईत एका माध्यमसंस्थेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. गेली अनेक दशकं जागतिकीकरणाच्या फायद्यांबद्दल बोलल्यानंतर जग आज औद्योगिक धोरणं, निर्यातीवर नियंत्रण आणि टॅरिफच्या युद्धासारख्या परिस्थितीशी झगडत आहे, असंही त्यांनी सांगितलं. ऊर्जा क्षेत्रात अनुकूल परिस्थिती निर्माण करणं हे भारतासाठी येत्या काही दशकांत महत्त्वाचं धोरणात्मक ध्येय असेल, असं जयशंकर यांनी नमूद केलं. सब का साथ, सब का विकास हे ब्रीद देशाच्या परराष्ट्र धोरणातही लागू होत असून रशिया आणि युक्रेन, इस्रायल आणि इराण, विकसित पाश्चात्य देश आणि दक्षिणेकडचे विकसित देश, तसंच ब्रिक्स आणि क्वाड या दोन्ही बाजूंशी एकाच वेळी संबंध जपणाऱ्या फार मोजक्या देशांपैकी भारत एक आहे, यावर त्यांनी जोर दिला.

<><><><><>

भारताचं स्थूल देशांतर्गत उत्पादन गेल्या दहा वर्षांत १०५ टक्के वाढीच्या दरानं दुप्पट झालं आहे. देशाचा जीडीपी २०१५ मध्ये २१शे अब्ज डॉलर होता तो २०२५ मध्ये ४ हजार तीनशे अब्ज डॉलर झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं ही आकडेवारी जाहीर केली आहे. अमेरिका, चीन, जर्मनी आणि जपान नंतर जीडीपीच्या बाबतीत भारत आता जगातला पाचवा सर्वात मोठा देश बनला आहे. भारत लवकरच जपानला मागे टाकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी त्र्यंबकेश्वरचा अकराशे कोटींचा विकास आराखडा तयार  केला असून त्याचा पहिला टप्पा कुंभमेळ्यापर्यंत पूर्ण केला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांनी आज त्र्यंबकेश्वरला भेट दिली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या आराखड्या अंतर्गत दर्शनाकरता कॉरिडॉर, पार्किंगची व्यवस्था, शौचालयाची व्यवस्था करण्यात येणार आहे. वेगवेगळ्या कुंडांचं, मंदिराचं रेस्टोरेशन तसंच विविध सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, असं फडणवीस यांनी सांगितलं. अकरा पूल बांधण्यात येणार असून रस्त्याचं जाळं तयार केलं जात असल्याचंही फडणवीस म्हणाले. पाणी शुद्ध रहावं म्हणून एक आराखडा  तयार केला जात असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, असं ते म्हणाले. त्याआधी फडणवीस यांनी त्र्यंबकेश्वर मंदिरात जाऊन पूजा केली. तसंच साधु आणि महंतांशी चर्चा केली. यावेळी मंत्री गिरीश महाजन, दादाजी भुसे आदी मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

वेव्हज् यंग फिल्ममेकर स्पर्धेसाठी देशभरातून तेराशेपेक्षा जास्त स्पर्धकांनी नाव नोंदणी केली आहे. यातल्या वीस स्पर्धकांची अंतिम यादीत निवड झाली आहे. अमोल गुप्ते आणि चैतन्य चिंचलीकर यांचं मार्गदर्शन तसंच व्हिसलिंग वूड्स

इंटरनॅशनलची मदत या स्पर्धकांना मिळाली. व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलमधे मार्गदर्शन तसंच प्रशिक्षण दिलं जातं.

<><><><><>

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी बेहिशोबी रोख रक्कम सापडल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाच्या अंतर्गत चौकशीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर काल रात्री उशिरा प्रसिद्ध झाला. या अहवालात छायाचित्रं आणि चित्रफितींचाही समावेश आहे. या प्रकरणी न्यायमूर्ती वर्मा यांचं स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयानं प्रसिद्ध केलं. वर्मा यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी किंवा त्यांच्या कुटुंबियांपैकी कोणीही घरातल्या कोणत्याही स्टोअररूमध्ये रोख रक्कम ठेवलेली नाही, ज्या खोलीत ही रोख रक्कम सापडली, ते आऊटहाऊस असून ते आणि त्यांचं कुटुंब राहात असलेल्या मुख्य घरापासून वेगळं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरच्या आरोपांच्या चौकशीसाठी तीन सदस्यांची अंतर्गत चौकशी समिती स्थापन केली आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती शील नागू, हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती जी. एस. संधवालिया आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश न्यायमूर्ती अनू शिवरामन हे या समितीचे सदस्य आहेत. दरम्यान, न्यायमूर्ती वर्मा यांना कोणतंही न्यायालयीन काम न देण्याचे निर्देश सरन्यायाधीश खन्ना यांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना दिले आहेत.

<><><><><>

सायबर फसवणुकीसाठीच्या एक नऊ तीन शून्य या हेल्पलाईनवर आलेल्या ११० तक्रारी २४ तासांच्या आत सोडवून मुंबई पोलिसांनी त्यातून सुमारे १ कोटी ४९ लाख रुपये जप्त केले आहेत. शुक्रवारी या हेल्पलाईनवर विविध प्रकारच्या

सायबर फसवणुकीच्या ११० तक्रारी आल्या. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं तत्काळ संबंधित बँकांशी संपर्क साधून पैसे फसवणूक करणाऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची प्रक्रिया थांबवली. अशा प्रकारची फसवणूक झाल्यास नागरिकांनी या हेल्पलाईनवर तातडीनं मदत मागावी, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**<><><><><>**

अभिनेता सुशांत सिंह राजपूत मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं बंद केला आहे. या प्रकरणी सीबीआयनं दोन वेगवेगळे क्लोजर रिपोर्ट दाखल केले. एका तक्रारीत सुशांतच्या वडिलांनी अभिनेत्री रिया चक्रवर्तीवर आरोप केले होते. याचा क्लोजर रिपोर्ट सीबीआयनं पाटणा इथं विशेष न्यायालयात दाखल केला. दुसरी तक्रार अभिनेत्री रिया चक्रवर्ती हिनं सुशांतच्या बहिणींविरोधात मुंबईत दाखल केली होती. त्याचा क्लोजर रिपोर्ट मुंबईत विशेष न्यायालयात सादर करण्यात आला.

**<><><><><>**

निवडणूक  आयोग अकार्यक्षम आणि अपयशी ठरला असून या संस्थेनं लोकांचा विश्वास गमावला आहे, अशी टीका राज्यसभेचे सदस्य कपिल सिब्बल यांनी केली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेला ते मुलाखत देत होते.  राज्यघटनेला अपेक्षित असलेल्या जबाबदाऱ्या निवडणूक आयोगानं पार पाडल्या नाहीत, असं सिब्बल म्हणाले. ईव्हीएमच्या मुद्द्याशिवाय इतर अनेक गंभीर मुद्दे आहेत ज्यामुळे निवडणूक प्रक्रिया बाधित होते. ही समस्या आपल्याला एकत्र येऊन सोडवावी लागेल, असं सिब्बल म्हणाले.

**<><><><><>**

भारतात पूर्वीपासून मिळणारा गोळी सोडा आता साऱ्या जगात  गोळी पॉप सोडा या नावाने ओळखला जाईल असं कृषी आणि प्रक्रीयाकृत अन्नपदार्थ विकास प्राधिकारणाने सांगितलं आहे.  हे पेय जागतिक स्तरावर लोकप्रिय असून त्यातल्या

नाविन्यामुळे ग्राहकांचं आकर्षण ठरत आहे. अमेरिका, युके, युरोपातले अन्य देश आणि आखाती देशांमधे या पेयाला मागणी वाढत असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

जागतिक हवामान दिन आज सर्वत्र साजरा करण्यात येत आहे. हवामानाविषयी अभ्यास, आणि जनजागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी २३ मार्च रोजी हा दिवस साजरा केला जातो. सुरुवात  मध्ये जागतिक हवामान संघटनेची स्थापना २३ मार्च १९५० रोजी झाली, त्याचं औचित्य साधून १९६१ पासून हा दिवस साजरा केला जातो. “आगाऊ सूचना मिळालेली दरी एकजुटीने सांधूया” ही यंदाच्या हवामानदिनाची संकल्पना आहे.

<><><><><>

भारतीय बास्केटबॉल संघ फिबा पुरुष एशिया चषक स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. संघानं काल रात्री मनामा इथं झालेल्या सामन्यात यजमान बहारिनचा ८१-७७ असा पराभव केला. भारताकडून हर्ष डागर, गुरबाज संधू, कंवर संधू, प्रणव प्रिंस आणि हाफिज यांनी शानदार खेळ केला. आता भारतीय संघ ५ ते १७ ऑगस्टदरम्यान सौदी अरेबियात जेद्दाह इथं कॉन्टिनेंटल स्पर्धा खेळेल.

<><><><><>

इंडियन प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये आज दुपारी साडेतीन वाजल्यापासून सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना रंगणार आहे. हैदराबाद इथं हा सामना होईल. आजचा दुसरा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होईल. चेन्नई इथं सायंकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल.

<><><><><>

मियामी ओपन टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांबरी आणि त्याचा पोर्तुगीज जोडीदार नुनो बोर्ज यांनी पुरुष दुहेरीच्या उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

//<><><><><>//